بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांची सत्यता आणि जागतिक पातळीवर जमाअतची प्रगतीवर आधारित काहीं श्रद्धावर्धक आणि विश्वासपूर्ण प्रसंगांचा उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १९ मे २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ
نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहाच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणालेः

जमाअत अहमदियावर परमेश्वराकडून होत असलेली अनंत कृपा आणि उन्नतीबद्दल हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात की, हा देखील अल्लाहचा एक मोठा चमत्कार आहे की, सर्वत्र विरोध आणि निषेधानंतर देखील जमाअत प्रगतीशील आहे. तुम्हाला महिती का यात काय गूढ आहे? यात गूढ एवढेच की ज्याला परमेश्वर स्वतः उभा करतो आणि जो खरोखर त्याच्याकडून प्रकट होतो आणि दिवसेंदिवस प्रगतीच्या मार्गावर अग्रसर असतो, अशा दर्जेचा प्रतिष्ठान दररोज प्रकाशमान होत जातो, उजळ होत राहतो. आणि त्याचे विरोधक आणि अनुयायी मोठ्या दुःखाने मरून जातात. ज्याला परमेश्वर वाढवू इच्छितो त्याला कोणीही थांबवू शकत नाही. कारण त्यांच्या प्रयत्नांनी जर ती थांबली, तर परमेश्वराला पराभूत करणारा कोणीतरी आहे, असे ग्रहीत केले जाईल, आणि हे अटल आहे की परमेश्वरावर कोणीही प्रभुत्त्व गाजवू शकत नाही.

हजरत अपेक्षित मसीह यांच्या या वचनांना पूर्ण होताना आम्ही दररोज आपल्या डोळ्यातून पाहात आहोत. शत्रूने वैयक्तिक आणि संघटित प्रयत्न केले; परंतु अल्लाहने हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांना दिलेल्या वचनानुसार की, ''मी तुझा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवीन आणि मी तुझ्या प्रामाणिक आणि सत्यनिष्ठ श्रद्धावंतांच्या समूहाचा विस्तार करेन.'' या वचनानुसार, आम्ही जमाअतचा विस्तार होताना पाहत आहोत. या तथाकथित मौलवींना आणि विरोधकांना असे वाटते की आम्ही हजरत अपेक्षित मसीह (अ.स.)ची जमाअतला

आमच्या फुंकरीने नष्ट करू, परंतु त्यांना हे माहित नाही की ते अल्लाहशी स्पर्धा करत आहेत आणि अल्लाहला आव्हान देऊन ते स्वतःचा नाश करत आहेत आणि निश्चितच अल्लाह त्याच्या सेवकास मदत करतो आणि समर्थन करतो आणि सहाय्य करतो.

सर्वशक्तिमान अल्लाहची मदत आणि समर्थनाचे दर्शन आम्ही जगाच्या कोपऱ्यात स्थित देशांतून अनुभव करतो. तो अशा दुर्गम भागात देखील सहाय्यता प्रदान करतो ज्याची कोणीही कल्पना करू शकत नाही. विरोधक सर्वतोपरी प्रयत्न करतात पण अपयशी ठरतात. काही ठिकाणी लोकांची जीवित आणि वित्तहानी करून जमाअतला घाबरवू इच्छितात; पण त्यांना काहीच लाभ मिळत नाही आणि निराशा सदैव त्यांच्या पदरी पडते.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांना दिलेल्या वचनांनुसार परमेश्वराची मदतीचे प्रसंगे तर भरपूर आहेत, ज्याचे अवलोकन करणे अशक्यप्रायः आहे, तरी यावेळी जमाअतला लाभलेली ईश्वरीय देणगींचे काही प्रसंगवर्णन करेन. या प्रसंगावरुन हे प्रदर्शित होईल अल्लाह कशाप्रकारे हजरत अपेक्षित मसीह यांची सत्यता लोकांच्या मनात घालतो.

काही लोक अज्ञानामुळे विरोध करतात आणि जेव्हा त्यांना सत्य माहित होते तेव्हा ते त्यास स्वीकारतात. अशीच एक घटना काँगो किन्शासाच्या अमीर साहिबांनी लिहिली आहे की, तिथल्या एका गावात आमचे प्रचारक साहेब प्रचार करत असताना स्थानिक इमामसोबत येशू ख्रिस्तच्या मृत्युविषयी चर्चा करू लागले. जेव्हा त्या बिगर अहमदी इमामला जाणीव झाली की येशूला जीवंत घोषित करण्यात पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अपमान आहे तेव्हा त्याने लगेच सत्यता कबूल केली आणि इमाम महदीचे आगमनाची गरज त्याना पटली आणि शेवटी तो आपल्या कुटुंबातील सहा लोक आणि एकवीस अनुयायांसह जमाअत अहमदिया मध्ये प्रविष्ट झाला.

काही ठिकाणी परमेश्वर स्वतः प्रसारासाठी अनुकूल परिस्थिती तयार करतो. गिनी कनाकरीचे धर्मोपदेशक लिहितात की जेव्हा त्यांनी एका गावात प्रचार सुरु केला तेव्हा त्या गावातील एका प्रौढ व्यक्ति म्हणाला की, मी माझ्या आजोबांकडून ''महदी'' हा शब्द अनेक वेळा ऐकला आहे; परंतु त्याची तपशीलपासून अनभिज्ञ होतो. आज तुम्ही तपशीलवार वर्णन केले आहे, म्हणून मी

अहमदिया स्वीकारतो. मग त्यांनी गावकऱ्यांना अहमदिया स्वीकारण्याचे आवाहन केले, परिणामी इमामसह अनेक लोकांनी दीक्षा घेतली.

त्याचप्रमाणे, गांबियाचे धर्मोपदेशक लिहितात की, जेव्हा प्रचारक संघ तिथल्या एका गावात गेले तेव्हा इतर गोष्टींबरोबरच त्यांनी निष्ठेच्या दहा अटी वाचून दाखवल्या. या अटी ऐकल्यानंतर या गावातील विवेकपूर्ण लोकांना समजले की हेच खरे इस्लामचे प्रतिबिंब आहे. गावकऱ्यांनी कबूल केले की त्यांनी इस्लामची ही सुंदर शिकवण प्रथमच ऐकली आहे. त्यामुळे प्रदीर्घ प्रश्नोत्तरांच्या सत्रानंतर सुमारे दोनशे लोक अहमदियामध्ये सामील झाले.

काही लोकांनी एका आफ्रिकन देशातील आमच्या प्रचारकाशी संपर्क साधला आणि त्यांच्या भागात प्रचार करण्यास आवाहन केले. कारण आम्हाला कळले आहे की तुम्ही लोक मुलांना पवित्र कुरआन शिकवण्याची व्यवस्था करतात. त्यामुळे दुसऱ्या दिवशी आमचे शिष्टमंडळ तेथे पोहोचले आणि प्रदीर्घ प्रचार सत्रानंतर मोठ्या संख्येत लोक अहमदिया मध्ये प्रविष्ट झाले. त्यानंतर गावकऱ्यांनी गावातील सर्व मुलांना आमच्यासमोर आणले की, (आता)ही जमाअतची मुले आहेत, त्यांना पवित्र कुरआन शिकवण्याची व्यवस्था करा, यावर प्रचार साहेबांनी त्यातील दोन मुलांना निवडले की त्यांना पवित्र कुरआनची शिक्षा दिली जाईल जेणेकरून ते मग इतर मुलांना शिकवतील.

हुजूर अनवर म्हणाले की, पाकिस्तानमध्ये आम्हाला पवित्र कुरआन वाचणे नव्हे तर ऐकण्यावर देखील बंदी आहे. एक अहमदी पवित्र कुरआन ऐकत असल्यामुळे त्याच्यावर खटला भरण्यात आला. एक अहमदी पवित्र कुरआनचे पठण ऐकत असल्यामुळे त्याच्यावर खटला दाखल करण्यात आला. हा या तथाकथित मुस्लिमांचा इस्लाम आहे आणि दुसरीकडे लोक आपल्या मुलांना पवित्र कुरआन शिकवण्यासाठी जमाअतकडे सोपवत आहेत, कारण जमाअत अहमदियाचे अनुयायी हेच पवित्र कुरआनचे खरे वाचक आणि आज्ञाधारक आहेत

आफ्रिकन देश 'चाड'च्या राजधानीत आमची पहिली मशीद बांधण्यात आली तेव्हा मत्सर विरोधकांनी त्याला कडाडून विरोध करायला सुरुवात केली. तेथील इस्लामिक कौन्सिलमध्ये जमाअतच्या विरोधात तक्रार केल्यावर त्यांनी उत्तर दिले की प्रार्थना करणे हा अहमदींचा अधिकार आहे. आम्ही त्यांची मशीद कशी बंद करू? हुजूर अनवर म्हणाले की, तिथल्या इस्लामिक कौन्सिलला किमान अक्कल तर आहे आणि न्यायप्रिय आणि प्रामाणिक तर आहेत. पाकिस्तानमध्ये

न्यायाधीशही अहमदिया जमाअतबद्दल द्वेष ठेवतात आहे आणि अहमदियांना त्यांच्या मशिदींमध्ये प्रार्थना करण्याचे आणि त्यांच्या प्रार्थनास्थळांना मशिदी म्हणण्याचे स्वातंत्र्य नाही.

मात्र, इस्लामिक कौन्सिलने विरोधकांना सांगितले की, तुम्हाला जर उपद्रवाची भीती वाटत असेल तर पोलिसांकडे तक्रार करा. पोलिसांना कळवल्यावर पोलिसांनी संपूर्ण तपास केली, मशिदीच्या बांधकाम परवानगीची आणि जमाअतची नोंदणीची कागदपत्रे तपासली, स्थानिक प्रमुखाकडून माहिती घेतली, मशिदीला भेट दिली आणि पोलीस या निष्कर्षापर्यंत पोहोचले की अहमदिया जमातचा हे कोणत्याही प्रकारचा नवीन धर्म स्थापित करत नाहीत आणि पवित्र प्रेषित (स.) यांची निंदा देखील करत नाहीत किंबहुना त्यांचा अतोनात सम्मान करतात.

अल्लाह ज्याला मार्गदर्शन करू इच्छितो त्याच्यासाठी विचित्र मार्गाने व्यवस्था करतो. साओ तोमे हा आफ्रिकेतील एक प्रदेश आहे. तेथील प्रचारक लिहितात की मोरोक्कोहून आलेल्या साओ तोमेमधील एका पर्यटकाने सहज तिथल्या आमच्या मशिदीत शुक्रवारची नमाज अदा केली. तेथे त्यांनी अरबी भाषेत ''सिर्रूल्ल खिलाफा'' आणि ''मज़हब के नाम पर खून'' ही पुस्तके वाचली. एम.टी.ए. अल-अरबिया'चे काही कार्यक्रम पाहिले, आंतरराष्ट्रीय दीक्षा समारोहची रेकॉर्डिंग पाहिले. नंतर काही वेळाने तो पुन्हा आला आणि त्याने दीक्षा फॉर्म मागितला आणि लगेच फॉर्म भरला. आमचे धर्मोपदेशक म्हणाले की काही दिवस विचार करा आणि प्रार्थना करा आणि मग जमाअतमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घ्या. त्यावर तो म्हणाला, मी रात्रभर नमाज पढली आणि भरपूर प्रार्थना केली आता जर मी इमाम महदीला न स्वीकारता मृत्यु पावलो तर माझे मरण निरर्थक आणि विनाशक ठरेल. म्हणून त्यांनी ताबडतोब दीक्षा घेतली. हुजूर अनवर म्हणाले की मोरोक्कोमध्ये जमाअत असली तरी तिथल्या जमाअतशी त्यांचा संपर्क झाला नाही. अल्लाहने त्याला आफ्रिकेतील एका दुर्गम भागातील दुसऱ्या देशात पाठवले आणि तेथे जाऊन त्याच्या मार्गदर्शनासाठी सबब तयार केले.

मध्य आफ्रिकेतील एका व्यक्तीने जमाअतवर संशोधन केल्यानंतर दीक्षा घेताना त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. त्यांना विचारल्यावर ते म्हणाले की, मी जमाअतच्या विरोधकांकडून जमाअतबद्दल खूप काही ऐकले होते. पण हा प्रतिज्ञा फॉर्म आणि त्यातील दहा अटी वाचून मला माझ्या भूतकाळातील जीवनाची

किळस आली आहे. हा प्रतिज्ञा फॉर्म वाचल्यानंतर मला कळले की अहमदिया जमाअत ही खरी आणि सच्ची जमाअत आहे.

हुजूर अनवर यांनी आयव्हरी कोस्ट, बेलीझ, उझबेकिस्तान आणि गयाना इत्यादी देशांतून अहमदियत स्वीकारल्याच्या अनेक श्रद्धावर्धक घटना मांडल्यानंतर म्हणाले की, मी हजरत अपेक्षित मसीहाला अल्लाहने दिलेल्या वचनांच्या पूर्ततेच्या किंचित घटना कथन केल्या आहेत, अशा असंख्य घटना आहेत. विरोधक आपापल्या परीने प्रयत्न करत आहेत, पण दुसरीकडे अल्लाह जगातील प्रत्येक देशात जमाअतच्या विकासाचे नवे मार्ग उघडत आहे. म्हणून, जिथे आपण अल्लाहचे कृतज्ञ असले पाहिजे, तिथेच आपल्या परिस्थितीचे मूल्यमापन करत राहिले पाहिजे. आणि विश्वासाला दृढ करण्याचाही प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या पिढ्यांच्या हृदयात हे देखील स्थापित केले पाहिजे की परीक्षा येऊ शकतात परंतु अंतिम विजय अल्लाहने स्थापन केलेल्या समूहचाच आहे, म्हणून आपला विश्वास कधीही डगमगू देऊ नका. अल्लाह सर्व नवीन सामील झालेल्या आणि जुन्या अहमदींना स्थिरता देवो. विश्वास आणि श्रद्धेत प्रगतशील करो. आमीन.

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर यांनी ४ मृतकांचा उल्लेख केला आणि त्यांची नमाज-ए-जनाजा गायब अदा करण्याची घोषणा केली: १. परवीन अख्तर साहिबा पत्नी गुलाम कादिर साहिब रहिवासी सियालकोट, ज्यांचे वयाच्या नव्वदव्या वर्षी निधन झाले. त्यांचा एक मुलगा, आरिफ महमूद साहब. उपदेशक बेनिन आहेत, ते बेनिन मध्ये प्रचार करत असल्यामुळे त्यांच्या आईच्या अंत्यविधीला उपस्थित राहू शकले नाहीत. २. मुमताज वसीम साहिबा पत्नी चौधरी वसीम अहमद साहब नासीर ऑफ घटयालियान्. त्यांचे दोन पुत्र जमाअतीय कार्यात समर्पित आहेत. एक मुलगा झांबियामध्ये धर्मोपदेशक आहे. ३. ब्रिगेडियर मुन्नवर अहमद राणा साहिब सरचिटणीस जिल्हा रावळपिंडी. ४. ग्रुप कॅप्टन सेवानिवृत्त शकूर मलिक साहिब माजी उपप्रमुख अहमदिया जमाअत रावळपिंडी. अल्लाह सर्वांवर दया करो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ.
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ.